MHSO190018902018

दाखल तारीख :- ०७/१२/२०१८,

नोंदणी तारीख :- ०७/१२/२०१८

निकाल तारीख :- ०४/०५/२०२६

कालावधी :- वर्षे महिने दिवस

०७ ०४ २७

**भाग – 'अ'**

**Form No. XXXII**
**(Title Page of the Judgment)**
**(Para 44(i) of Chapter VI of Criminal Manual)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र. २), ता. मोहोळ, जि. सोलापूर**

**(पिठासीन अधिकारी : एस.व्ही.मुंडे)**

**नियमीत फौजदारी खटला क्र.२७१/२०१८** **नि.क्र.**

| | | |
|---|---|---|
| | **गु.र.क्र.१४४/२०१८,** भा.दं.वि. कलम ३७९ सह कलम ३४ व पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९, १५ अधिनियमान्वये, पोलीस ठाणे कामती. | |
| **अभियोगपक्ष** | | महाराष्ट्र सरकार मार्फत पोलीस निरीक्षक,<br>कामती पोलीस ठाणे, ता.मोहोळ, जि. सोलापूर. |
| **प्रतिनिधीत्व** | | अभियोगपक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती कस्तुरे – गाढवे. |
| **आरोपी** | १. | मोशिन हुसेन शेख,<br>वय – २४ वर्षे, व्यवसाय – चालक व मजुरी, |
| | २. | अल्लाउद्दीन इलाई शेख,<br>वय – २३ वर्षे, व्यवसाय – चालक व मजुरी,<br>दोघेही रा.वांगी, ता.दक्षिण सोलापूर. |
| **आरोपींतर्फे विधिज्ञ** | | श्री. टी.डी.आगलावे. |

**भाग 'ब'**

**(Para 44(ii) of Chapter VI of Criminal Manual)**

| | | |
|---|---|---|
| १ | गुन्हा घडल्याचा दिनांक | ०४/०७/२०१८ |
| २ | प्रथम खबर अहवाल दिनांक | ०४/०७/२०१८ |
| ३ | फिर्याद दाखल झाल्याचा दिनांक | ०७/१२/२०१८ |
| ४ | अपराध निश्चिती दिनांक | ०३/०२/२०२२ |
| ५ | पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २७/०९/२०२२ |
| ६ | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | ०४/०५/२०२६ |
| ७ | न्यायनिर्णयाचा दिनांक | ०४/०५/२०२६ |
| ८ | शिक्षा सुनावणीचा दिनांक | -- |

## आरोपींचा तपशिल

| नं. | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जामीन दिनांक | गुन्हयाचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावणी | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोशिन हुसेन शेख, | ०४/०७/२०१८ | ०५/०७/२०१८ | भा.दं.वि. कलम ३७९ सह कलम ३४ व पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९, १५ अन्वये | निर्दोष | -- | -- |
| २ | अल्लाउद्दीन इलाई शेख, | ०४/०७/२०१८ | ०५/०७/२०१८ | | निर्दोष | -- | -- |

## न्या य नि र्ण य

## (अधिघोषीत दिनांक ०४/०५/२०२६)

आरोपींविरूध्द भारतीय दंड विधानाचे (यापुढे संक्षेपासाठी भा.दं.वि. असे संबोधण्यात येते) कलम ३७९ सह कलम ३४ व पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९, १५ अन्वये दंडनीय अपराधासाठी संपरीक्षा घेण्यात आली.

**अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :-**

**०२.** दिनांक ०४/०७/२०१८ रोजी ०३.३० वाजण्याच्या सुमारास मौजे शिंगोली,

ता.मोहोळ, जि.सोलापूर येथील तरटगावच्या गावच्या सोलापूर ते मंगळवेढा रोडलगत गुंजेगाव जाणारे फाटयाजवळ आरोपी क्र.१ ते १२ यांनी संगनमत करुन समान उद्देशाच्या पुरःस्सणार्थ शासनाचा कोणत्याही प्रकारचा कर न भरता व पर्यावरणाचा –हास होईल अशाप्रकारे स्वतःचे फायद्याकरीता आरोपींनी त्यांचे ताब्यातील टेम्पो नं.एम एच १७–के/६३०३ मध्ये गुंजेगाव शिवारातील सिना नदीच्या पात्रातून दीड ब्रास वाळू शासनाच्या संमतीशिवाय अप्रामाणिकपणे चोरी केलेली आहे. त्यामूळे सदर आरोपींविरूध्द पोलीस ठाणे, कामती येथे गुन्हयाची प्रथम खबर दाखल केली.

**०३.** सदर प्रथम खबरीवरून पोलीस ठाणे, कामती येथे गुन्हा नोंदणी क्रमांक १४४/२०१८, कलम ३७९ सह कलम ३४ व पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९, १५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलिस हेड कॉन्सटेबल, ब.नं.१०७९ श्री.बी.बी.काकडे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळी भेट देवून पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार करुन साक्षीदारांचे जबाब नोंदवून आरोपींविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** माझे पुर्वधिकारी यांनी आरोपींविरूध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३७९ सह कलम ३४ व पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९, १५ अन्वये नि.क्र.११ वर दोषारोप निश्चित केलेला आहे. आरोपींनी त्यांच्यावरील आरोप नाकारला व संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. आरोपींचे प्रतिकथन नि.क्र.०९ ते १० अन्वये, तर फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ (१) (ब) अन्वये निवेदन नि.क्र.३३ व ३४ वर नोंदवण्यात आले. त्यामध्ये त्यांनी वाळू चोरीसंदर्भात ठराविक कोठा दिलेला असतो तो पुर्ण करण्यासाठी खोटी केस केल्याचे कथन केलेले आहे.

**०५.** अभियोगपक्षाची एकंदर हकीकत, अभिलेखावरील पुरावा व आरोपींचा बचाव विचारात घेता, खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्या प्रत्येक मुद्यांचा निष्कर्ष मी त्यावरील कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०४/०७/२०१८ रोजी ०३.३० वाजण्याच्या सुमारास मौजे शिंगोली, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथील तरटगावच्या हद्दीत सोलापूर ते मंगळवेढा रोडलगत गुंजेगाव जाणा–या फाटयाजवळ आरोपी क्र.१ व २ यांनी संगनमत करुन समान उद्देशाच्या पुरःस्सणार्थ त्यांच्या ताब्यातील टेम्पो नं.एम एच १७–के/६३०३ मधून बेकायदेशीर बिगरपास सुमारे दीड ब्रास वाळू अंदाजे किंमत रु.७५००/– ही सिना नदीच्या पात्रातून शासनाच्या संमतीशिवाय अप्रामाणिकपणे चोरी केल्याची बाब अभियोगपक्षाने सिध्द केली काय ? | **नाही.** |
| २. | उपरोक्त दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपी क्र.१ व २ नी संगनमत करुन समान उद्देशाच्या पुरःस्सणार्थ वाळूचा अतिरिक्त उपसा करुन नियमीत पर्यावरण बिघडवले आणि पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ च्या कलम ९ व १५ या नियमाचे उल्लंघन केल्याची बाब अभियोगपक्षाने सिद्ध केली काय ? | **नाही.** |
| ३. | अंतिम आदेश काय ? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करीता</u> :–**

**०६.** अभियोगपक्षातर्फे प्रथम खबरी प्रविण प्रकाश कांबळे (सा.क्र.०२), घटनास्थळ पंच विठ्ठल निवृत्ती ओहोळ (सा.क्र.०१), घटनास्थळ पंच उत्तम भिमराव वाघमारे (सा.क्र.०३), तपासी अंमलदार बी.बी.वाकडे (सा.क्र.०४) आणि साक्षीदार शंकर हिरु चव्हाण (सा.क्र.०५) मौखिक पुरावा अनुक्रमे नि.क्र.२१, १३, २६, २८ आणि ३१ अन्वये नोंदवलेला आहे.

०७. उपरोक्त मौखीक पुराव्याव्यतीरीक्त अभियोगपक्षाने कागदोपत्री पुरावा म्हणून फिर्याद (नि.क्र.२२), गुन्हयाची प्रथम खबर (नि.क्र.२३) व जप्ती पंचनामा (नि.क्र.२७) अन्वये दाखल करून आपली भिस्त ठेवली.

०८. उभयपक्षाचा युक्तीवाद ऐकला व कागदपत्रांचे अवलोकन केले.

०९. आरोपींविरूध्द भा.दं.वि. कलम ३७९ सह कलम ३४ व पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९, १५ अन्वये शिक्षाधीन गुन्हा केल्याचा आरोप ठेवण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचे अत्यावश्यक घटक खालीलप्रमाणे.

अ) गुन्हयात अंतर्भुत असलेला मुद्देमाल चल संपत्ती असणे आवश्यक आहे,
ब) सदर मुद्देमाल एखाद्याच्या ताब्यात असला पाहीजे,
क) आरोपींनी सदर मुद्देमाल सदर व्यक्तीच्या संमत्तीशिवाय स्वत:च्या ताब्यात घेतला पाहीजे,
ड) आरोपीचे कृत्य हे सदर व्यक्तीच्या ताब्यातून तो मुद्देमाल उद्देशपुर्वक घेण्याचे असले पाहीजे,
इ) आरोपीचा उद्देश स्वत:ला गैरलाभ व ईतरास गैरहानी होण्याचा असावा,
फ) आरोपीचे कृत्य ईच्छापुर्वक व अप्रामाणीकपणाचे असावे.

१०. फौजदारी कायद्याचे असे मुख्य तत्व आहे की, जोपर्यंत आरोपीवरील आरोप संशयापलीकडे सिध्द होत नाहीत, तोपर्यंत त्याला निष्पाप समजावे लागेल. त्याचप्रमाणे अभियोगपक्षावर आरोपीवरील आरोप संशयापलीकडे सिध्द करण्याची जबाबदारी असते. सदर शाबीतीची जबाबदारी ही मुलत: अभियोगपक्षावरच असते व ती कधीही आरोपीवर नसते. खटल्यातील आरोपीस केवळ अशा परिस्थितीत दोषी धरता येईल, जेंव्हा अभियोगपक्ष सदर शाबीतीची जबाबदारी निर्विवादपणे, नि:संशयरीत्या पुर्ण करेल. प्रस्तुत प्रकरणातील आरोपींचे भविष्य सात साक्षीदारांच्या साक्षीवर अवलंबून आहे, त्यामूळे अभियोगपक्षाने सदर साक्षीदारांद्वारे गुन्हयाच्या

शाबीतीची जबाबदारी पुर्ण केली अथवा कसे, हे पाहण्यासाठी त्यांच्या पुराव्याचे सुक्ष्म अवलोकन करणे क्रमप्राप्त ठरते.

**११.** आरोपींवरील आरोप सिद्ध करण्याकरीता अभियोगपक्षाने ही बाब सिद्ध करणे क्रमप्राप्त ठरते की, दिनांक ०४/०७/२०१८ रोजी ०३.३० वाजण्याच्या सुमारास मौजे शिंगोली, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथील तरटगावच्या हद्दीत सोलापूर ते मंगळवेढा रोडलगत गुंजेगाव जाणा–या फाटयाजवळ आरोपी क्र.१ व २ यांनी संगनमत करुन समान उद्देशाच्या पुरःस्सणार्थ त्यांच्या ताब्यातील टेम्पो नं.एम एच १७–के/६३०३ मधून बेकायदेशीर बिगरपास दीड ब्रास वाळू नदीच्या पात्रातून शासनाच्या संमतीशिवाय अप्रामाणिकपणे चोरी केली.

**१२.** प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षाने ०५ साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर नोंदवून उपरोक्त कागदपत्रांवर भिस्त ठेवलेली आहे. साक्षीदारांच्या कथनातून आरोपींवरील गुन्हा सिध्द होण्यासाठी गुन्हयाच्या मुलभूत घटकांची सिध्दता होणे महत्वपुर्ण ठरते. त्यामूळे अभियोगपक्षाने सदर मुलभूत घटकांची सिध्दता केली आहे अथवा कसे, हे पाहण्यासाठी अभियोगपक्षाच्या पुराव्याचे सुक्ष्म अवलोकन करणे महत्वपुर्ण ठरते.

**१३.** प्रथम खबरी प्रविण प्रकाश कांबळे (सा.क्र.०२) यांनी सरतपासात कथन केले आहे की, ते सन २०१४ ते सन २०१९ या काळात कामती पोलीस ठाणे येथे पोलीस शिपाई म्हणून कार्यरत होते. घटना दि.०४/०७/२०१८ रोजीची असून त्यादिवशी पहाटे ०३.३० वाजेच्या सुमारास ते, सपोनि उंदरे, सपोउनि चव्हाण, पोशि माळी, पोना डोंगरे यांच्यासोबत सरकारी वाहनाने शिंगोली परिसरात गस्तीचे काम करत असताना अकोले गावच्या परिसरात अवैधरित्या वाळू चोरी होत असल्याची बातमी त्यांना मिळाली. त्यानंतर ते गुंजेगाव कॉर्नर रस्त्यावर जात असताना गुंजेगावाकडून एक टेम्पो येत असताना दिसले. त्यावेळी त्यांनी तो थांबवून त्यात काय आहे हे

पाहिले असता त्यात त्यांना वाळू असल्याचे दिसून आले. सदर टेम्पोचा क्र.एमएच–१७–के–६३०३ असा होता. त्यावेळी त्यांनी सदर टेम्पोचालक व त्याचा जोडीदार यांना त्यांची नावे विचारले असता त्यांनी त्यांची नावे अल्लाउद्दीन शेख व मोमीन शेख असल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांनी आरोपींकडे वाळू वाहतुकीचा पासबाबत विचारणा केली असता आरोपींनी त्यांच्याकडे वाळू वाहतुकीचा पास नसल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी आरोपींना वाळू कोठून भरली याची विचारणा केली असता आरोपींनी ती गुंजेगाव येथील सिना नदीच्या पात्रातून भरल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी सदर घटनेबद्दल खबर निशाणी २२ दाखल करुन प्रथम खबरी अहवाल निशाणी २३ तयार करण्यात आला.

**१४.** सदर साक्षीदाराने त्यांच्या उलटतपासामध्ये असे कथन केले की, ते गस्तीच्या कामासाठी रात्री ११ वाजता पोलीस ठाण्याहून निघाले होते, कामती ते शिंगोली हे अंतर सुमारे ९ ते १० किमीचे असून सदर अंतर वाहनाने जाण्यास अर्धा तास लागतो, त्यांनी सदर कार्यवाहीनंतर कामती पोली ठाण्यास सकाळी ०६.०० ते ०६.३० वजेच्या सुमारास पोहोचले असल्याचे कथन केले. त्यांनी ज्याठिकाणी टेम्पो थांबविला त्याठिकाणीच्या आजूबाजुस कोणाची शेती व घरे आहेत हे ते सांगू शकत नाही, टेम्पो थांबविला त्याठिकाणी लोकांची राहती घरे आहेत का हे त्यांनी पाहिलेली नाही, त्यांनी स्वतः टेम्पोमध्ये वाळू किती आहे याबाबत तज्ञ व्यकतीचे मत घेतले नसल्याचे मान्य केले. उर्वरीत उलटतपास नकारार्थी स्वरुपात नोंदविला गेला.

**१५.** सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर साक्षीदार हे पोलीस शिपाई म्हणून कार्यरत असताना दि.०४/०७/२०१८ रोजी पहाटे ०३.३० वाजण्याच्या सुमारास इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यासोबत अकोले गावच्या परिसरामध्ये गुंजेगाव कॉर्नरजवळ गेले असता त्यांना टॅम्पो क्र.एमएच १७ के ६३०३ दिसून आला. त्यामध्ये वाळू

होती. मात्र उलटतपासामध्ये त्यांनी वाहन थांबविल्याची वेळ, टेम्पो थांबविलेल्या ठिकाणाच्या आजूबाजूला कुणाची शेती व घरे आहेत हे त्यांना सांगता आले नाही. तसेच वाळूची मोजणी न केल्यासंदर्भात मान्य केले. सदर साक्षीदाराच्या पुराव्यावरुन टेम्पो व वाळूची स्थिती सिद्ध होते परंतु गुन्हा सिद्ध करण्यासाठी सदर साक्षीदाराची साक्ष पुरेशी ठरत नाही. सबब, अभियोगपक्षाचा इतर पुरावा तपासून पाहणे क्रमप्राप्त ठरते.

**१६.** पंच विठ्ठल निवृत्ती ओव्हाळ (सा.क्र.२) यांनी सरतपासामध्ये असे कथन केले की, दि.०४/०७/२०१८ रोजी ते पोलिसांसोबत कुठेही गेले नव्हते. त्यादिवशी त्यांचेसमक्ष पोलिसांनी कुठलीही कार्यवाही केली नव्हती. त्यांची जप्ती पंचनाम्यावर सही असल्याचे सांगून पंचनामा त्यांचेसमक्ष झालेला नसल्यामुळे त्यातील मजकुराबाबत त्यांनी माहित नसल्याचे कथन केले आहे. अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात देखील त्यांनी अभियोगपक्षास सहाय्यकारी ठरेल असे कोणतेही विधान केले नाही. सदर साक्षीदाराने फिर्यादीच्या कथनास पुरक असे कोणतेही विधान केले नाही त्यामुळे अभियोग पक्षाचा उर्वरीत पुरावा तपासणे क्रमप्राप्त ठरते.

**१७.** पंच उत्तम भिमराव वाघमारे (सा.क्र.३) यांनी सरतपासामध्ये असे कथन केले की, दि.०४/०७/२०१८ रोजी पहाटे ते शेतामध्ये पाणी देण्याकरीता उठले असता पोलिस कर्मचारी चव्हाण यांनी त्यांच्यासोबत चल काम आहे असे म्हणून त्यांना घेवून गेले होते. ते पोलिसांसोबत शिंगोली शिवारामध्ये पाहाटे ०३.४५ वाजता गेले होते. त्याठिकाणी त्यांना टेम्पोमध्ये १.५ ब्रास वाळू आहे असे सांगितले. टॅम्पो विटकरी रंगाचा होता. त्यांनी टेम्पो व वाळू स्वतः पाहिली होती. त्यांच्यासोबत दुसरा पंच विठ्ठल ओव्हाळ होता. पोलिसांनी वाळूसह टेम्पो जप्त केला व त्यांना सहया करण्यास सांगितले होते. त्यांची जप्ती पंचनाम्यावरील अनुक्रमांक ०१ वर सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे कथन केले. त्याठिकाणी ते अर्धा ते पाउण तास होते.

१८. सदर साक्षीदाराने त्यांच्या उलटतपासामध्ये असे कथन केले की, त्यांना पंचनामाकरीता लेखी नोटीस दिलेली नव्हती. ते टेम्पोचा क्रमांक सांगू शकत नाही, त्यांचेसमोर वाळूचे मोजमाप केले नसल्याचे कथन केले. कामती पोलीस ठाण्यामध्ये त्यांच्याविरुद्ध दारुच्या केसेस आहेत, त्यांचे पोलीस ठाणेमध्ये येणेजाणे असते, त्यांचे पोलिसांसोबत चांगले संबंध आहेत, ते आरोपींची नावे सांगू शकत नसल्याचे मान्य केले. उर्वरीत उलटतपास नकारार्थी स्वरुपात नोंदविला गेला.

१९. सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर साक्षीदाराने टेम्पो व वाळूच्या जप्ती पंचनाम्यासाठी पंच साक्षीदार म्हणून गेल्याचे सांगितले. त्यांनी टेम्पो विटकरी रंगाचा असून त्यामध्ये १.५ ब्रास वाळू असल्याचे सांगितले. परंतु उलटतपासामध्ये पोलिसांनी त्यांना पंचनाम्यासाठी नोटीस दिली नाही, त्यांचे पोलिसांसोबत चांगले संबंध आहेत, आरोपींची नावे सांगू शकत नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदाराच्या पुराव्यावरुन वाळू व टेम्पोची उपस्थिती निश्चित होते परंतु घटनेच्यावेळेस आरोपींचा थेट सहभाग होता किंवा कसे ते सिद्ध होत नाही. सबब, अभियोग पक्षाचा इतर पुरावा तपासून पाहणे क्रमप्राप्त ठरते.

२०. तपासिक अंमलदार श्री.बी. बी. वाकडे (सा.क्र.४) यांनी सरतपासामध्ये असे कथन केले की, दि.०४/०७/२०१८ रोजी ते पोलिस हवालदार या पदावर कामती पोलीस ठाणे येथे कार्यरत होते. त्यावेळी ठाणे अंमलदार यांनी गु.र.नं.१४४/२०१८ भा.दं.वि. कलम ३७९, ३४ व पर्यावरण संरक्षण अधिनियम चे कलम ९ व १५ या गुन्हयाचा तपास त्यांच्याकडे सुपुर्द करण्यात आला. त्यांना तपासाकामी फिर्याद व पंचनामा मिळाला. त्यांनी फिर्यादीचे अवलोकन करुन साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले.

२१. सदर साक्षीदाराने उलटतपासात असे कथन केले की, प्रस्तुत गुन्हयाचा तपास

करण्याकरीता वरिष्ठांनी त्यांना लेखी आदेश दिला नव्हता. फिर्यादी व इतर गस्त घालण्याबाबत गेल्याची नोंदीचा उतारा स्टेशन डायरीमधून त्यांनी प्राप्त केला नसल्याचे कथन केले. पोलिस कर्मचा–याव्यतिरीक्त इतर कोणाचाही जबाब त्यांनी नोंदविला नसल्याचे मान्य केले. त्यांनी महसुल कार्यालयामध्ये प्रस्तुत गुन्हयासंदर्भात पत्रव्यवहार केला नसल्याचे कथन केले.

२२. सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर साक्षीदार हे तपासिक अंमलदार असून त्यांनी प्रस्तुत गुन्हयाचा तपास केला. परंतु उलटतपासामध्ये तपासादरम्यान स्टेशन डायरीतील नोंदी तपासल्या नव्हत्या आणि महसूल प्रशासनाशी पत्रव्यवहार केला नव्हता असे मान्य केले. सदर साक्षीदार हे घटनेचे प्रत्यक्षदर्शीर साक्षीदार नसल्याने आरोपींचा प्रस्तुत गुन्हयामध्ये सहभाग होता किंवा कसे हे सिद्ध करण्याकरीता सदर साक्षीदाराची साक्ष उपयक्त ठरत नाही. सबब, अभियोग पक्षाचा इतर पुरावा तपासून पाहणे क्रमप्राप्त ठरते.

२३. साक्षीदार शंकर हिरु चव्हाण (सा.क्र.५) यांनी सरतपासामध्ये असे कथन केले की, दि.०४/०७/२०१८ रोजी ते कामती पोलीस ठाणे येथे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक म्हणून कर्तव्यावर होते. सदरदिवशी गस्त घालीत असताना गुंजेगाव रस्त्याने एक टेम्पो येताना दिसले. त्यांनी टेम्पोला थांबवून पाहिले असता टेम्पोमध्ये अंदाजे १.५ ब्रास वाळू आढळून आली. सदरचा टेम्पो टाटा कंपनीचा विटकरी रंगाचा मॉडेल ४०७ असून त्यांचा क्रमांक एमएच–१७–के–६३०३ असा होता. त्यांनी दोन पंच उत्तम वाघमारे व विठ्ठल ओव्हाळ यांच्यासमक्ष टेम्पो जप्त केला होता. सदरचा जप्ती पंचनामा ३.४५ ते ४.३० च्या दरम्यान करण्यात आला होता.

२४. सदर साक्षीदाराने उलटतपासामध्ये असे कथन केले की, सदरदिवशी गस्त घालण्यासाठी जात असल्याबाबतची नोंद त्यांनी स्वतः स्टेशन डायरीमध्ये केली नसल्याचे मान्य केले. घटनास्थळाच्या पुर्वेला सोलापूर, पश्चिमेला मंगळवेढा येथे जाणारा रस्ता, दक्षिणेला गुंजेगाव

कडे जाणारा रस्ता व उत्तरेला शिंगोलीकडील शिवार असल्याचे कथन केले. घटनास्थळावर वाहनांची वर्दळ असते, वाळूचे मोजपा त्यांनी स्वतः केले नाही, वाळुचा नमुना त्यांनी स्वतः प्रयोगशाळेमध्ये पाठविला नाही, प्रस्तुत गुन्हयासंदर्भात मी महसुल प्रशासनाला पत्रव्यवहार केला नसल्याचे मान्य केले. उर्वरीत उलटतपास नकारार्थी स्वरुपात नोंदविला.

२५. सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, घटेनच्यावेळी सदर साक्षीदार हे सहा.पोलिस उपनिरीक्षक म्हणून कर्तव्यावर होते. दि.०४/०७/२०१८ रोजी गस्त घालत असताना त्यांना गुंजेगाव रस्त्याने टेम्पो येत असताना दिसला. त्यामध्ये अंदाजे १.५ ब्रास वाळू होती. त्यांनी टेम्पो चालकाचे नाव रहेमान असे कायतर असल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराच्या साक्षीमधून टेम्पो व वाळू संदर्भात जप्तीची कार्यवाही केल्याचे सिद्ध होते. परंतु आरोपींचा गुन्हयामध्ये थेट सहभाग होता किंवा कसे हे सिद्ध होत नाही.

२६. प्रस्तुत प्रकरणात आरोपीवर भारतीय दंड संहिता कलम ३७९ अन्वये चोरी व पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ चे कलम १५ अन्वये विनापरवाना वाळू उपसा व वाहतूक केल्याचा आरोप करण्यात आलेला आहे. अभियोग पक्षाने सादर केलेल्या साक्षी व पुराव्यांमधून हे स्पष्ट दिसून येते की, वास्तविक वाळू आरोपीकडून जप्त झाली होती का, हे ठोस व कायदेशीररीत्या सिद्ध झालेले नाही. पंचसाक्षीदारांनी त्यांच्या समोर पंचनामा झाल्याचे स्पष्ट नाकारले असून, त्यांना पंचनाम्याचा मजकूरही माहीत नसल्याचे कबूल केले आहे. आरोपीकडून वाळूची जप्ती झाली होती हा खटल्याचा कळीचा मुद्दा आहे. मात्र, ही जप्ती कायद्याने अपेक्षित साक्षी, पंचनामा व नोंदींच्या आधारे सिद्ध न झाल्यास, संपत्तीवरील बेकायदेशीर ताब्याचा घटकच सिद्ध होत नाही.

२७. अभियोगपक्षाच्या सर्व साक्षीदारांच्या पुराव्याचा आणि पंचनाम्यांचा सूक्ष्म अभ्यास केल्यास असे दिसून येते की, टेम्पो व त्यातील वाळूची उपस्थिती साक्षीदारांनी नोंदविली असली

तरी, चोरीच्या गुन्ह्यातील आवश्यक घटक म्हणजे वाळूचा कायदेशीर ताबा कोणाचा होता, आरोपींनी ती स्वतःच्या ताब्यात घेतली का, त्यांचा गैरलाभाचा किंवा इराद्याचा हेतू होता का, आणि त्यांच्या कृतीमध्ये अप्रामाणिकपणा होता का, हे कोणत्याही साक्षीदाराच्या पुराव्यामधून सिद्ध झालेले नाहीत.

२८. याशिवाय, वाहनातील वाळूचे मोजमाप केवळ अंदाजावर करण्यात आलेले असून, कोणतीही मोजमाप यंत्रणा वापरलेली नाही. तपास अधिकाऱ्याने घटनास्थळाचा फोटो, गट क्रमांक, किंवा इतर मालमत्तेच्या अधिकाराचे कोणतेही पुरावे सादर केलेले नाहीत. या सर्व त्रुटी अभियोग पक्षाच्या पुराव्याची विश्वासार्हता न्यून करतात. केवळ आरोपी गाडी चालवत होता किंवा गाडीत वाळू होती, हे पुरेसे नाही; ती वाळू नद्याच्या पात्रातून बेकायदेशीररित्या उपसलेली आहे व ती जप्त करण्यात आली आहे, हे नोंद व पंचनामा पुराव्याद्वारे ठोसपणे सिद्ध होणे आवश्यक आहे.

२९. या सर्व पार्श्वभूमीत, पंचनामा व जप्ती कायदेशीररित्या सिद्ध न झाल्याने, व वाळू खरोखर आरोपीकडून जप्त झाली होती हे शंका उत्पन्न होणार नाही अशा स्वरूपात सिद्ध न झाल्याने, फौजदारी कायद्यानुसार चोरीचा गुन्हा पूर्णतः सिद्ध झालेला नाही, असे मानणे भाग आहे. परिणामी, आरोपीविरुद्धचा चोरीचा आरोप कायद्यानुसार यशस्वी ठरू शकत नाही. या पार्श्वभूमीवर, आरोपींविरुद्ध लावलेले आरोप शंका उत्पन्न होणार नाही अशा प्रकारे सिद्ध झालेले नाहीत, त्यामुळे न्यायालयाने आरोपींना निर्दोष मुक्तता देणे योग्य ठरेल. तसेच, न्यायालयाने आरोपींना निर्दोष मुक्तता करत असताना, पुढील काळात न्यायालयीन प्रक्रियेची सुसूत्रता आणि अपील प्रक्रियेत आरोपींच्या उपस्थितीसाठी योग्य हमी म्हणून, सन्माननीय सेशन कोर्टामध्ये अपील दाखल झाल्यास, प्रॉडक्शन रिलीझ (पी.आर.) जामिन म्हणून प्रत्येकी रुपये २५,०००/– रकमेत जामिन ठेवण्याचा आदेश देणे उचित ठरेल. सबब, मुद्दा क्रमांक ०१ व ०२ चे उत्तर मी नकारार्थी स्वरूपात नोंदवून मुद्दा क्रमांक ०३ करिता खालील आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी क्र.१ मोशिन हुसेन शेख व आरोपी क्र.२ अल्लाउद्दीन इलाही शेख यांची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) प्रमाणे भारतीय दंड विधानाच्या शिक्षाधीन कलम ३७९ सह वाचन ३४ व पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९ व १५ अन्वये दंडनीय गुन्हा केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन कदबे रद्द समजण्यात यावेत.

३. गुन्हयात जप्त मुद्देमाल एक विटकरी रंगाचा ४०७ मॉडेलचा टाटा कंपनीचा टेम्पो त्याचा नोंदणी क्र.एम एच १७– के/६३०३ हे यापुर्वीच सुपूर्दनाम्यांद्वारे मुळ मालकाच्या ताब्यात देण्यात आलेले आहेत. सदरचा आदेश कायम करण्यात येतो.

४ जप्त मुद्देमाल वाळू ही गौण खनिज असल्यामूळे ती संबंधीत तहसील कार्यालयामार्फत आव्हानाच्या कालावधीनंतर लिलाव करून आलेली रक्कम शासन जमा करण्यात यावी व तसा अनुपालन अहवाल या न्यायालयास सादर करण्यात यावा.

५. आरोपी क्र.१ व २ यांनी प्रस्तुत न्यायनिर्णयाविरूध्द अपील झाल्यास अपीलीय न्यायालयासमोर हजर राहणेबाबत कलम ४३७(अ) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या पुर्ततेकरीता आरोपींनी प्रत्येकी रक्कम रु.२५,०००/– चा वैयक्तीक जातमुचलका दाखल करावा जो पुढील सहा महिन्याकरीता अस्तित्वात राहतील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आला).

SANTOSH VISHNU MUNDE

Digitally signed by SANTOSH VISHNU MUNDE
Date: 2026.05.04 17:02:45 +0530

**दिनांक :–** ०४/०५/२०२६

**(एस.व्ही. मुंडे),**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, मोहोळ.

# –: परिशिष्ट :–

## फॉर्म – क

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(३) प्रमाणे)**

### फिर्यादी/बचावपक्ष/न्यायालय/साक्षीदारांची यादी

अ) अभियोपक्षाच्या साक्षीदारांची यादी.

| अ.क्र. | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| १. | विठ्ठल निवृत्ती ओहोळ (नि.क्र.१३) | पंच |
| २. | प्रविण प्रकाश कांबळे (नि.क्र.२१) | फिर्यादी |
| ३. | उत्तम भिमराव वाघमारे (नि.क्र.२६) | पंच |
| ४. | बी. बी. वाकडे (नि.क्र.२८) | तपासी अंमलदार |
| ५. | शंकर हिरु चव्हाण (नि.क्र.३१) | साक्षीदार |

ब) बचाव पक्षाच्या साक्षीदारांची यादी.

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| –– | –– | –– |

क) न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी.

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| | निरंक | लागू नाही. |

### फिर्यादी/बचावपक्ष/न्यायालय/ निशाणी क्रमांक यादी

अ) अभियोगपक्ष निशाणी क्रमांक यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र. २२ | खबर |
| २. | निशाणी क्र. २३ | प्रथम खबरी अहवाल |
| ३. | निशाणी क्र. २७ | जप्ती पंचनामा |

ब) बचाव पक्षाने मान्य केलेल्या दस्ताऐवाजची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | लागु नाही. |

क) बचाव पक्ष निशाणी क्रमांक यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | लागु नाही. |

ड) न्यायालय निशाणी क्रमांक यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | नि.क्र. ११ | दोषारोप |
| २. | नि.क्र.३३ व ३४ | आरोपींचे ३१३ निवेदन |

इ) मुद्देमाल वस्तु.

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | लागु नाही. |

SANTOSH VISHNU MUNDE
Digitally signed by SANTOSH VISHNU MUNDE
Date: 2026.05.04 17:02:15 +0530

**दिनांक :–** ०४/०५/२०२६ **(एस. व्ही. मुंडे),**

न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, मोहोळ.

# C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this PDF file of Judgment/Orders are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer - III | : | Sapana A. Madgundi |
| Court | : | J.M.F.C., Court No. 2, Mohol |
| Date | : | 04/05/2026 |
| Judgment signed by the Presiding Officer | : | 04/05/2026 |
| Judgment / Order Uploaded on | : | 04/05/2026 |